# राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य
डॉ.नायडू रुग्णालय आवार,पुणे-१

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५९५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : crs_d83@yahoo.com


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/नाव समाविष्ट/10337-10438/२०१२ दिनांक :-31 डिसेंबर २०१२

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व)

२) आरोग्य अधिकारी
तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई

विषय :- जन्म नोंदणीत बाळाचे नाव समाविष्ट करणेबाबत...

संदर्भ :- भारताचे उप महानिबंधक जन्म-मृत्यु यांचे पत्र क्र.१/२/रुल्स(१०)/२०१२-व्हीएस(सीआरएस) दिनांक १७/१२/२०१२.

आपणास विदितच आहे की जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १४ व महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी नियम २०००, नियम क्र.१० नुसार जन्म नोंदणी मध्ये नोंदणी दिनांकापासून १५ वर्षा पर्यंत बाळाच्या नावाची नोंद करण्याची तरतुद आहे. राज्यामध्ये बहुतांश नागरिकांच्या नावाची नोंद त्यांच्या जन्म नोंदणी मध्ये नसल्याचे या कार्यालयास निवेदने प्राप्त झालेले आहेत व सदर कालावधीत अधिक वाढ करुन मिळणे बाबत निबंधक कार्यालयांची पत्रे या कार्यालयास प्राप्त झालेली आहेत. सदर बाब केंद्र शासनाच्या निर्देशनास आणून देण्यात आली व त्यास अनुसरुन केंद्र शासनाचे संदर्भिय पत्रान्वये नागरिकांच्या नावाची नोंद त्यांच्या जन्म नोंदणीत करण्यासाठी ३१.१२.२०१४ या तारखे पर्यंत १५ वर्षांचा कालावधी शिथिल करण्यात आला आहे. यास्तव आपणास सूचीत करण्यात येते की या परिपत्रकाच्या दिनांका पासुन ३१.१२.२०१४ पर्यंत या कालावधी मध्ये जास्तीत जास्त नागरिकांना त्यांचे नाव जन्म नोंदणीत समाविष्ट करुन घेण्यासाठी आपल्या स्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. या कालावधी मध्ये जन्म नोंदणीत नाव समाविष्ट करण्यासाठी करावयाची पध्दत :-

१) ज्या नागरिकांच्या जन्माची नोंदणी १.१.२००० पूर्वी झालेली आहे अशा सर्व नागरिकांना या संधीचा लाभ देण्यात येत आहे या मध्ये सन १९६९ पुर्वीच्या नोंदणीचा सुध्दा समावेश आहे.

२) संबंधित व्यक्ती अथवा त्यांचे पालक यांचा बाळाचे नाव समाविष्ट करणेबाबतचा अर्ज घेण्यात यावा.
३) नावाच्या शाबीतीकरिता कुठलाही एक शासकिय पुरावा उदा. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, एस.एस.सी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र, आधार कार्ड इ. ची प्रत घेण्यात यावी.
४) बाळाचे संपूर्ण नाव लिहिण्याबाबत आग्रह धरण्यात यावा. उदा. राम मनोहर जोशी
५) बाळाचे नाव समाविष्ट झालेनंतर हे नाव बदलता येत नाही याची कल्पना नागरिकांना देण्यात यावी व तसा फलक दर्शनीय भागावर लावण्यात यावा.
६) काही धर्मामध्ये आई-वडिल यांचे आडनावापेक्षा बाळाचे आडनाव वेगळे ठेवण्याची प्रथा असते तसेच बाळाचे मधले नाव वडिलांच्या नावा पेक्षा वेगळे असते अशा प्रकरणांत संबंधितांनकडून अर्जा मध्ये तसा स्पष्ट उल्लेख नमूद करुन घेण्यात यावा.
७) बाळाचे नाव जन्म नोंदणीत समाविष्ट केले नंतर शेरा रकान्यात या परिपत्रकाचा संदर्भ, क्रमांक व दिनांक नमूद करुन निबंधक/उपनिबंधक जन्म-मृत्यु यांनी स्वाक्षरी करुन दिनांक नमूद करावा.
८) नाव नोंदणीचे अर्ज जन्म अहवाला सोबत कायमस्वरुपी जतन करण्यात यावेत.

सदरचे परिपत्रक आपले अधिनस्त सर्व निबंधक / उपनिबंधक यांना देण्यात यावेत व जास्तीत जास्त नागरिकांना या संधीचा लाभ मिळण्यासाठी प्रसिध्दी माध्यमांद्वारे जनजागृती करावी.
३१.१२.२०१४ या तारखे नंतर हा कालावधी कुठल्याही परिस्थित वाढवून मिळणार नाही याची दक्षता सर्व स्तरावर घेण्यात यावी.
आपणांद्वारे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत माहितीस्तव सादर :-
१) मा. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

प्रत सस्नेह :-
२) उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे .......... (सर्व)

प्रत उचित कार्यवाहीस्तव :-
३) सहाय्यक संचालक, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, --(सर्व)

E:\83\Circular.doc